**<u>नियमित दिवाणी दावा क्र ८७/२०१६ मधील नि. २७ खालील आदेश.</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार दत्ता हरिदास जायभाय यांनी दाखल करून त्यास प्रतिवादी पणात म्हणुन दाव्यात सामील करण्याची विनंती केली आहे.

**२.** सदर अर्जावरील वादीने त्यांचे म्हणने दाखल करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**३.** अर्जदाराचे विधीज्ञ श्री एस.आर. झरकर आणि वादीचे विधीज्ञ श्री एच.टी.काशीद यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**४.** वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. अर्जदाराचे विधीज्ञ श्री एस.आर.झरकर यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हा, प्रतिवादी क्रमांक १ ची मुलगा असुन सत्यभामा हरिदास जायभाय ही प्रतिवादी क्रमांक १ ची पत्नी आहे, सुरेखा हरिदास जायभाय ही प्रतिवादी क्रमांक १ ची मुलगी आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित मालकी हक्काची आहे. सदर मिळकतीमध्ये अर्जदार व त्याची आई, बहीण यांचा अविभक्त हिस्सा आहे. वादीने दाव्यात अर्जदार तसेच अर्जदाराची आई व बहीण यांना प्रतिवादी पणात सामिल केलेले नाही. अर्जदार हा आवश्यक पक्षकार असल्यामुळे अर्जदारांने प्रतिवादी पणात समाविष्ठ करून घेण्याचे आदेश वादींना देण्यात यावेत, अशी विनंती केली आहे. या उलट वादींचे विधीज्ञ श्री एच.टी. काशीद यांनी असा युक्तीवाद केला की सत्यभामा हरिदास जायभाय ही प्रतिवादी क्रमांक १ ची बेकायदेशीर दुसरी पत्नी असुन अर्जदार दत्ता हरिदास जायभाय व सुरेखा सचिन नागरगोजे हे

प्रतिवादी क्रमांक १ यास बेकायदेशीर दुस-या पत्नीपासुन झालेले अनारस अपत्य आहेत, त्यामुळे सत्यभामा व अनारस अपत्यचा वादी मिळकतीमध्ये कोणतेही हक्क व अधिकारी नाही, म्हणुन सदर अर्ज हा पुर्णपणे कायदयाच्या तरतुदीच्या विरूध्द असल्यामुळे नामंजुर करण्यात यावा.

**५.** प्रस्तुतच्या दाव्यातील कथनाचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, अर्जदार यांचे प्रतिवादी क्रमांक १ सोबत नातेसंबंध आहेत. अर्जदाराने दावा मिळकतीत कायदयानुसार हिस्सा प्राप्त होईल अथवा नाही, ही बाब प्रकरणात पुढे साक्षीपुराव्यानुसार समोर येईल, परंतु आज या क्षणी दाव्यात अर्जदार हे अत्यंत आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना वादींना प्रतिवादी पणात सामील करण्याबाबत आदेश देणे न्यायउचित राहील, म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्जदाराचा अर्ज निशाणी २७ रूपये ५०० च्या खर्चासहीत मंजुर करण्यात येतो.

**२.** वादीने, वाद पत्रात निशानी १मध्ये निशाणी २७ मधील अर्जदाराने समाविष्ठ करावा आणि दुरूस्ती प्रत प्रकरणात मुदतीत दाखल करावे.

(हाश्मी एच.ए.एच.आय.)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
जामखेड.

दिनांक : १५ /०२/२०१९.